# समाजसेवेच्या निष्ठेतून संघटनेच्या शिखरावर निखिल गायकवाड यांच्यावर भाजपा लातूर शहर संघटन सरचिटणीसपदाची जबाबदारी!

**लातूर/प्रतिनिधी :** वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षापासून समाजसेवेत झोकून देत कार्यरत राहिलेले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित व 'समाजातून... समाजासाठी' या ब्रीदवाक्याने आपली वेगळी ओळख निर्माण करणारे निखिल भैय्या गायकवाड यांची नुकतीच भारतीय जनता पार्टी, लातूर शहर संघटन सरचिटणीस म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीचे सर्व स्तरांवर स्वागत होत असून, शहरातील सामाजिक व राजकीय वर्तुळात उत्साहाचे वातावरण आहे.



निखिल गायकवाड यांनी गेल्या दोन दशकांहून अधिक काळ समाजकार्यात विविध उपक्रमांद्वारे प्रभावी भूमिका बजावली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदावरून त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबवले. डॉ. आंबेडकर पार्क येथे एलईडी बोर्डाच्या माध्यमातून जनजागृतीचा संदेश, 'जय भीम' चित्रपट प्रदर्शनीद्वारे सामाजिक विचारांचे प्रसारण, तसेच 'रमाई अन्नसेवा योजना' अंतर्गत तब्बल ३३,००० जेवणाचे डबे गरजूंपर्यंत पोहोचविण्याचे उल्लेखनीय कार्य त्यांनी केले. लातूर शहरातील सर्व बौद्ध विहारांना लाडू वितरण करून सामाजिक ऐक्याचा संदेश दिला.

राजकीय क्षेत्रातही त्यांनी प्रगल्भ नेतृत्व दाखवले असून, भाजपाच्या युवा मोर्चात चार वेळा जिल्हा उपाध्यक्ष, जिल्हा चिटणीस व जिल्हाध्यक्ष (अनुसूचित जाती मोर्चा) या जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या. कार्यकर्ताभिमुख दृष्टिकोन, संघटन कौशल्य व प्रामाणिक वृत्ती यामुळे पक्षात त्यांचे स्थान अधिक दृढ झाले आहे.

सामाजिक जाणिवेतून प्रेरित होऊन त्यांनी सांगली-मिरज तसेच कोकण-सातारा पूरग्रस्त भागात मदतकार्य, तसेच कोविड काळात प्रभाग क्रमांक ११ मध्ये मास्क, सॅनिटायझर, फळे, भाज्या आणि राशन किट वाटप करून शेकडो कुटुंबांना दिलासा दिला. याशिवाय खासदारांच्या माध्यमातून तृतीयपंथी व वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांना आवश्यक अन्नधान्य व साहित्य पुरवून संवेदनशील समाजकारणाची नवी दिशा दाखवली.

या सर्व कार्याची दखल घेत भारतीय जनता पार्टीने त्यांच्यावर लातूर शहर संघटन सरचिटणीसपदाची जबाबदारी सोपवली आहे. ही जबाबदारी स्वीकारताना निखिल गायकवाड यांनी आपल्या प्रेरणास्थान भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेसमोर नतमस्तक होत "क्रांती का नारा है जय भीम, दुनिया में प्यारा है जय भीम" असा जयघोष करत नवी उमेद व्यक्त केली.



"ही संधी केवळ पदाची नाही, तर समाजकार्यातील आणखी मोठ्या जबाबदारीची आहे," असे भावनिक उद्गार त्यांनी यावेळी काढले.

आगामी काळात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री छत्रपती शिवेंद्रराजे भोसले, माजी मंत्री संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार, खासदार रमेश आप्पा कराड, बसवराज पाटील मुरूमकर, डॉ. अर्चना पाटील चाकूरकर, शिवाजीराव पाटील कव्हेकर, डॉ. सुनील गायकवाड, शैलेश लाहोटी, देविदास काळे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी त्यांना लाभणार आहे.

या नियुक्तीबद्दल जिल्हाध्यक्ष अजितसिंह (भैया) पाटील कव्हेकर, शैलेश गोजमगुंडे, प्रेरणा होनराव, गुरुनाथ मगे आदींनी निखिल गायकवाड यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

## संतोषीमाता मंदीरात भंडारा (महाप्रसाद) रविवारी आयोजन



**लातूर/प्रतिनिधी :** येथील संतोषी माता मंदिर हत्तेनगर, रोड क्र.४ येथे भंडारा (महाप्रसाद) याचे आयोजन रविवारी दि. १२ नोव्हेंबर २५ रोजी करण्यात आले आहे. दानशुर राजकुमार ठाकूर हे रविवारी नवरात्रनिमित्त भंडार महाप्रसाद करणार आहेत.


हत्तेनगर लातूर भागातील संतोषीमातेच्या मंदीरात नवरात्रोत्सव पार पडला. त्या निमित्त १२ ऑक्टोबर रविवारी सायंकाळी ५ ते ८ या दरम्यान भंडार महाप्रसाद होणार आहे.

तरी या भंडार (महाप्रसाद) चा लाभ घ्यावा अशी विनंती संतोषीमाता भक्त मोहन महाराज खंडेलवाल यांनी केली आहे.

## राज्यस्तरीय कार्यनिष्ठ शिक्षक व सामाजिक कृतज्ञता पुरस्कार २०२५ जाहीर

### कवी डॉ. संजय जमदाडे यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशनही होणार

**लातूर/प्रतिनिधी :** कर्मयोगी कै. ड. देविदासराव जमदाडे बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, लातूर यांच्यावतीने राज्यस्तरीय कार्यनिष्ठ शिक्षक पुरस्कार २०२५ आणि राज्यस्तरीय सामाजिक कृतज्ञता पुरस्कार २०२५ जाहीर करण्यात आले असून, त्यांचे वितरण रविवार, दि. १२ ऑक्टोबर २०२५ रोजी सायं. ५ वाजता जयक्रांती महाविद्यालय, लातूर येथे संपन्न होणार आहे.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. प्रा. गोविंदराव घार (व्यवस्थापन परिषद सदस्य, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड तसेच सचिव, भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर) उपस्थित राहणार आहेत.

प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. राजशेखर सोलापुरे (प्रसिद्ध व्याख्याते, लेखक व पुरस्कार निवड समिती प्रमुख), प्राचार्य (प्रो.) डॉ. श्रीधर कोल्हे (प्राचार्य, जयक्रांती महाविद्यालय, लातूर) आणि प्रा. डॉ. विजयकुमार करजकर (ज्येष्ठ साहित्यिक व मराठी विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर) उपस्थित राहतील.

कार्यक्रमात कवी डॉ. संजय जमदाडे तथा सौ. सुरेखा जमदाडे यांच्या काव्य संग्रहाचे प्रकाशनही करण्यात येणार आहे.

राज्यस्तरीय कार्यनिष्ठ शिक्षक पुरस्कार २०२५ साठी निवडलेले शिक्षक :

१. डॉ. बालासाहेब किलचे, पैठण, २. डॉ. महेश जाधव, परभणी, ३. डॉ. शोभा हनवते, छत्रपती संभाजीनगर, ४. डॉ. जितेंद्र पुल्ले, पूर्णा, ५. दीपक शिंदे, सांगोला, ६. अनंत कदम, उदगीर, ७. विवेक कोरे, तुळजापूर, ८. श्रीमती सुनीता पोटे, लातूर, ९. श्रीमती संगीता सौदागर, लातूर, १०. श्रीमती नाजेमा शेख

राज्यस्तरीय सामाजिक कृतज्ञता पुरस्कार २०२५ प्राप्तकर्ते :

१. व्ही. एस. कुलकर्णी, उदगीर, २. प्रल्हाद बाहेती, निलंगा, ३. संजय राजुळे, लातूर ४. रुद्र प्रतिष्ठान, लातूर

या कार्यक्रमाच्या आयोजना मागे कर्मयोगी कै.ड.देविदासराव जमदाडे बहुउद्देशीय सेवाभावी संस्था तसेच प्रभाकर पब्लिकेशन, लातूर यांचा पुढाकार असून, समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्याचा हेतू या उपक्रमामागे आहे.संस्थेच्यावतीने सर्वांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन कर्मयोगी कै.ड.देविदासराव जमदाडे बहुउद्देशीय सेवाभावी संस्था लातूर व प्रभाकर पब्लिकेशन, लातूर यांच्यावतीने करण्यात आले आहे.



संतोषी मातेस नवरात्रौत्सव निमित्त पूर्णिमेच्या दिवशीं सौ. संध्या संदीप भावे यांच्या कडून संतोषी माता चांदी की छत्री अर्पण करण्यत आली. मोहन महाराज यानी याचे अभिनंदन केले.


निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र

सितारी विमा सेवा केंद्र

दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.

वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत

जमीरोद्दीन सितारी

चेअरमन क्लक मेंबर CLIA

एजंट भरती चालू आहे.

संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396


### बारीक ..

आजकाल मॉडेलस्  
अबब केवढे बारिक  
असेवाटे वाटा त्यांस  
काजू बदाम खारीक

झिरो फिगर आकर्षे  
बारीकव्हावे अधिक  
बाबांनो सावरा जरा  
कोण सांगी बौध्दिक

कायखावे कधी कसे  
किती ती झिकझीक  
एक ग्रॅम वजन वाढे  
मनात वाढते चिरिक

शंभर आरशात पाही  
स्वतावरहोई आशिक  
मना मनाला भारवते  
शरीरयष्टी अलौकिक

किती करालव्यायाम  
स्वीमिंगजीमएरोबिक  
मज प्रमाणे बना सारे  
वाटती शब्द मौक्तिक

म्हणेआहे फीटफाईन  
जाणते शास्त्र जैविक  
सर्वत्र लोण असेच ते  
दिसू लागेल उदयिक

नाही मुळीचं चुकीचे  
शरिराचे हो कवतिक  
जपावे गुण आंतरिक  
उजळवे मन लौकिक

**हेमंत मुसरीफ पुणे.**  
९७३०३०६९९६.

## बेकायदा संपाविरुद्ध महावितरण औद्योगिक न्यायालयात; सात संघटनांच्या संयुक्त कृती समितीची संपातून माघार

**लातूर/प्रतिनिधी :** कामगार आयुक्त कार्यालयात समेट प्रकरणावर कार्यवाही सुरू असताना ७२ तासांच्या बेकायदा संपावर जाणाऱ्या ७ वीज कर्मचारी संघटनांच्या संयुक्त कृती समितीविरुद्ध महावितरणकडून मुंबई औद्योगिक न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. त्यावर शुक्रवारी (दि. १०) झालेल्या सुनावणी दरम्यान संयुक्त कृती समितीने संपातून २४ तासानंतर माघार घेत असल्याचे जाहीर केले.

दरम्यान, गेल्या दीड दिवसांच्या संपकाळात महावितरण, महापारेषण व महानिर्मितीमध्ये ६२.५६ टक्के अभियंते, अधिकारी व कर्मचारी कार्यालयांत उपस्थित होते तर ३७.४४ टक्के कर्मचारी या संपात सहभागी झाले होते.

प्रामुख्याने महावितरणमधील पुनर्रचना व इतर मागण्यांबाबत महवितरणमधील २९ पैकी ७ संघटनांच्या संयुक्त कृती समितीने ७२ तासांच्या संपाची नोटीस दिली होती. हा संप टाळण्यासाठी अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र, संचालक श्री. सचिन तालेवार (संचालन/प्रकल्प), श्री. राजेंद्र पवार (मानव संसाधन) यांनी स्वतंत्र बैठकी घेऊन सकारात्मक व मागण्यांशी सुसंगत भूमिका जाहीर केली. त्याप्रमाणे कृती समितीला बैठकीचे लेखी इतिवृत्त तसेच संप न करण्याचे आवाहन करणारे पत्रेही देण्यात आले.

कर्मचारी संघटनांच्या मागणीप्रमाणे व ग्राहकसेवा गतिमान करण्यासाठी पुनर्रचनेनुसार उपविभागांचे कामकाज प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आले आहे. या प्रायोगिक कालावधीत आवश्यकतेनुसार फेरबदल किंवा दुरूस्ती करून संघटना व व्यवस्थापनाच्या सहमतीनंतरच पुनर्रचनेच्या अंमलबजावणीबाबत अंतिम आदेश काढण्यात येईल हेही स्पष्ट करण्यात आले. मात्र संयुक्त कृती समितीने त्यासही दाद दिली नाही.

सध्या महाराष्ट्र अतिवृष्टी व पूर परिस्थितीच्या संकटातून सावरत आहे. सर्व शासकीय यंत्रणा युद्धपातळीवर कार्यरत आहेत. दिवाळी सण देखील काही दिवसांवर आला आहे. पूर परिस्थितीच्या संकट काळात तसेच सणासुदीच्या दिवसांत संप टाळून नागरिकांना वीज सेवा देण्याचे कर्तव्य बजवावे असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले. त्यालाही संयुक्त कृती समितीने प्रतिसाद दिला नाही.

दरम्यान, संपाची नोटीस मिळताच औद्योगिक विवाद अधिनियम अंतर्गत मुंबई येथील कामगार आयुक्त कार्यालयात समेटासाठी महावितरणकडून प्रकरण दाखल करण्यात आले होते. समेट प्रकरणावर कार्यवाही सुरू असताना संप करता येत नाही अशी कायद्यात तरतूद आहे. तसेच वीज ही अत्यावश्यक सेवा आहे व राज्यात महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षक अधिनियम (मेस्मा) लागू असल्याने हा संप करू नये असे आवाहन महावितरण व्यवस्थापनाकडून करण्यात आले होते.

मात्र समेट प्रकरणावर कार्यवाही सुरु असताना संयुक्त कृती समितीने गुरुवारी (दि. ९) संपाला सुरवात केली. त्यामुळे या बेकायदा संपाविरुद्ध मा. औद्योगिक न्यायालयामध्ये महावितरणने याचिका दाखल केली. ही याचिका दाखल करून घेत मा. न्यायालयाने कृती समितीला नोटीस बजावली. दुसऱ्या दिवशी, शुक्रवारी (दि. १०) सकाळी न्यायालयात याचिकेवर सुनावणी सुरु झाल्यानंतर संयुक्त कृती समितीने हा संप २४ तासांनंतर मागे घेत असल्याचे जाहीर केले.

## छठ पूजा / दिवाळी उत्सव २०२५ निमित्त रेल्वे मुंबई आणि वाराणसी दरम्यान १२ विशेष गाड्या चालविणार

**मुंबई/प्रतिनिधी :** आगामी छठ पूजा / दिवाळी उत्सवाच्या काळात प्रवाशांच्या सोयीसाठी रेल्वे प्रशासनाकडून लोकमान्य टिळक टर्मिनस आणि वाराणसी दरम्यान १२ विशेष गाड्या चालविण्यात येणार आहेत. तपशील पुढीलप्रमाणे आहेत:

लोकमान्य टिळक टर्मिनस – वाराणसी विशेष गाड्या

०४२२५ विशेष गाडी दि. १४.१०.२०२५ ते १८.११.२०२५ पर्यंत लोकमान्य टिळक टर्मिनस, मुंबई येथून प्रत्येक मंगळवारी १६.५५ वाजता सुटेल आणि वाराणसी येथे तिसऱ्या दिवशी ०२.०५ वाजता पोहोचेल.



०४२२६ विशेष गाडी १३.१०.२०२५ ते १७.११.२०२५ पर्यंत वाराणसी येथून प्रत्येक सोमवारी ०१.३५ वाजता सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस, मुंबई येथे दुसऱ्या दिवशी १४.२५ वाजता येथे पोहोचेल.

थांबे: ठाणे, कल्याण, नाशिक रोड, भुसावळ, खंडवा, इटारसी, राणी कमलापति (भोपाळ), बीना, वीरांगणा लक्ष्मीबाई झांसी, ओराई, कानपूर, लखनौ, सुलतानपूर आणि जौनपूर सिटी.

संरचना: ४ वातानुकूलित द्वितीय, ९ वातानुकूलित तृतीय आणि २ जनरेटर कार.

आरक्षण: विशेष गाडी क्र. ०४२२५ साठी आरक्षण दिनांक १२.१०.२०२५ पासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि वेबसाइट www.irctc.co.in वर सुरू होईल.

विशेष गाड्यांच्या थांबे व वेळापत्रकासाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.in या वेबसाइटला भेट द्या किंवा NTES अॅप डाउनलोड करा. प्रवाशांना विनंती करण्यात येते की ते या विशेष गाड्या सेवांचा लाभ घ्यावा.


टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-

मास्टर प्लेट ट्रेसिंग क्वालिटी

संपर्क

8600025070

9028376965

प्रिंटर्स पॅराडाईस

प्रिंटर रिपेअरिंग

कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस

टोनर रिफिलिंग


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६